महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/ ०६ /2024 DATE :- 12 /04/2024

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील राबोडी वाहतुक उप विभाग हद्दीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक जवळ शिशुज्ञान मदिर शाळेच्या बाजुला डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दिनांक १५/०४/२०२४ ते दिनांक १६/०४/२०२४ या कालावधीत स्टेज उभारण्यात येवून लहान मुलांचे सांस्कृतीक कार्यक्रम व ऑर्केस्ट्रा कार्यक्रम करण्यात येणार आहे. नमुद रस्ता अरुंद असल्याने या रोडवरील आंबेडकर चौक ते खोपटकडे जाणारी एक मार्गिका कार्यक्रमाचे दरम्यान बंद करणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) सिव्हिल हॉस्पीटल कॉर्नर कडुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोडने खोपट नाक्याचे दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक** येथे '' **प्रवेश बंद**'' करण्यात येते आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथुन सरळ उथळसर रोडने मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खोपट सिग्नल कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर च्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना खोपट सिग्नल येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) सदरची वाहने खोपट सिग्नल, कोलबाड नाका, मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.
ब) सदरची वाहने खोपट सिग्नल, चरई कट, अल्मेडा चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. १५/०४/२०२४ रोजी १२.०० वा. ते दि. १६/०४/२०२४ रोजी २४:०० वाजेपर्यंत कार्यक्रम संपे पावेतो अंमलात राहिल.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा.पोलीस उप आयक्त. परिमंडळ–१ / विशेष शाखा.ठाणे.

CS CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,ठाणे /नवी मुंबई /बृन्मुंबई महानगरपालिका.
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :–समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :–सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.राबोडी,नौपाडा,ठाणेनगर वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner